| | | | |
|---|---|---|---|
| MHWR010019372022 | खटला दाखल तारीख | | २१.१०.२०२२ |
| | खटला नोंदणी तारीख | | २१.१०.२०२२ |
| | खटला निकाल तारीख | | ०५.०५.२०२६ |
| | **कालावधी - ०३ वर्ष, ०६ महिने, १४ दिवस.** | | |

| **सत्र न्यायाधीश, वर्धा यांचे न्यायालयात<br>(पीठासीन अधिकारी – हेमंत भ. गायकवाड)** | |
|---|---|
| **<u>सत्र मामला क्रमांक ९४/२०२२</u>** | **निशाणी क्रमांक – २६.** |
| **सीएनआर क्रमांक –<br>एमएचडब्ल्यूआर०१००१९३७२०२२** | आरोप- भारतीय दंड विधानाचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अंतर्गत.<br>**प्रथम छापील खबर क्रमांक १०४/२०२१** |

**भाग 'अ'**
**(परिच्छेद ४४(१) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

| **प्रथम खबरी अहवाल माहिती / गुन्हा आणि पोलीस ठाणे** | | |
|---|---|---|
| फिर्यादी/अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>द्वारा–पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, कारंजा (घा.), तालुका कारंजा (घा.), जिल्हा वर्धा. |
| अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत | | **सरकारी अभियोक्ता,**<br>श्री. जी.व्ही. तकवाले |
| आरोपी | | **आकाश धनराजजी युवनाते**<br>वय २८ वर्ष, व्यवसाय – मजुरी, राहणार – जोगा, कारंजा (घा.), तालुका कारंजा (घा.), जिल्हा वर्धा. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | | मुख्य लोक अभिरक्षक श्री. एस.पी.काशीकर, आरोपीतर्फे. |

**भाग 'ब'**
**(परिच्छेद ४४(२) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | २५.०३.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | : | २५.०३.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दिनांक | : | ०१.१२.२०२१ व २१.१०.२०२२ |
| दोषारोपपत्र निश्चित दिनांक | : | २१.११.२०२५ |
| पुरावा सुरुवात दिनांक | : | ०२.०३.२०२६ |
| कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविल्याचा दिनांक | : | ०५.०५.२०२६ |
| युक्तिवादाची तारीख | : | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | : | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०५.०५.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | : | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप पत्र निश्चित | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्यापासून न्यायनिर्णय पर्यंत आरोपी कारागृहात होता काय? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकाश धनराजजी युवनाते | २३.०६.२०२१. | ०५.०७.२०२१. | भारतीय दंड विधानचे कलम ३५३, ५०४ व ५०६ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | नाही |

## भाग 'क'
## (परिच्छेद ४४(३) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)
## (अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| साक्षीदार क्रमांक १ | आकाश नामदेवराव शेंडे (निशाणी क्रमांक १३) | फिर्यादी |
| साक्षीदार क्रमांक २ | त्र्यंबक रामभाऊजी चतारे (निशाणी क्रमांक १६) | पंच साक्षीदार |

| आरोपीतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| | नाही | नाही |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| | नाही | नाही |

**(अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी)**

**'अ' – अभियोगपक्षातर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक पी.–१/सा.क्र.१ | तोंडी तक्रार. |
| २ | निशाणी क्रमांक पी.–२/सा.क्र.१ | छापील प्रथम खबर. |
| ३ | निशाणी क्रमांक पी.–३/सा.क्र.१ | मानराज युवनाते यांच्या घराचे विद्युत बील. |
| ४ | निशाणी क्रमांक पी.–४ व ५/सा.क्र.१ | दिनांक ०२.०३.२०२१ रोजीची विद्युत बील थकदारांची यादी व पत्र. |
| ५ | निशाणी क्रमांक पी.–६/सा.क्र.२ | पंच साक्षीदारांना दिलेली नोटीस. |
| ६ | निशाणी क्रमांक पी.–७/सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा. |

**'ब' – आरोपीतर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

**'क' – न्यायालयातर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

**'ड' – महत्वाचे पुरावे –**

| अनुक्रमांक | मुद्देमाल वस्तु क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

# –न्यायनिर्णय–

(जाहीर दिनांक ०५ मे, २०२६)

यातील आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की,

फिर्यादी, आकाश नामदेवराव शेंडे यांनी दिनांक २५.०३.२०२१ रोजी, तोंडी तक्रार दाखल केली की, दिनांक २५.०३.२०२१ रोजी, सकाळी १०.४५ वाजताच्या दरम्यान, ते, त्यांच्या कंपनीचे विशाल सदानंद ढोले, (सहायक अभियंता) आणि त्यांच्यासोबत कंत्राटी कर्मचारी, तुषार वळवटकर यांना जोगा येथे मनराज तुळशीराम युवनाते यांच्या घरी त्याच्यावर थकीत असलेले वीज बील रक्कम रुपये २,४६०/– मागण्याकरीता तसेच न भरल्यास विजपुरवठा खंडित करण्याचे आदेश दिल्याने मोटरसायकलने गेले होते. अंदाजे ११.१५ वाजताच्या दरम्यान, त्याच्या घरी पोहचल्यावर मनराज युवनाते घरी नव्हते त्याची पत्नी हजर असल्याने तिला वीजबीलाबाबत मागणी केली असता तिने आमच्याजवळ पैसे नाही व आम्ही वीज बील भरु शकत नाही असे सांगितले. त्यामुळे त्यांनी वीज बील भरत नसल्यामुळे त्याच्या घराचा विजपुरवठा खंडित करीत आहे व तुम्ही वीज बील भरल्यावर तो सुरळीत करण्यात येईल असे सांगितले. त्यावेळी तेथे हजर असलेला मनराज युवनाते यांचा पुतण्या आरोपी आकाश युवनाते याने त्यांना शिवीगाळ केली व 'तु विजपुरवठा खंडीत केला तर तुला येथे जीवाने मारुन टाकीन' अशी धमकी दिली.

३. त्यांनी त्याच्या धमकीला न जुमानता घराबाहेरील भिंतीवर असलेल्या मीटरचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यासाठी गेले असता आरोपीने त्यांच्याकडे लोखंडी फावडे फेकुन मारले, आरोपीकडे त्यांचे लक्ष असल्याने ते बाजुला झाले,

त्यामुळे फावडा त्यांना लागला नाही. त्यानंतर ते बाहेर निघण्यासाठी पलटले असता पुन्हा आरोपीने त्यांच्याकडे येवुन त्यांची गच्ची पकडली व त्यांना ओढताण केली, त्यामुळे त्यांच्या कर्तव्यावरील गणवेशाचा खिसा फाटला. आरोपीने त्यांच्या मानेवर एक बुक्की मारली तेव्हा त्यांच्यासोबत असलेले कंत्राटी कर्मचारी तुषार वळवटकर व गावातील लोकांनी त्यांचा वाद सोडविला. फिर्यादी शासकीय कामानिमीत्ताने मनराज युवनाते याचे घराचा विद्युत पुरवठा खंडीत करीत असताना आरोपीने शासकीय कामात अडथळा निर्माण करुन त्यांना मारहाण केली व कामापासुन परावृत्त केले व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली, म्हणुन त्यांनी तक्रार दाखल केली.

४. फिर्यादी आकाश शेंडे यांनी दिलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने पोलीस ठाणे, कारंजा (घा.) येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०४/२०२१, भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अन्वये (यापुढे **'संहिता'** असे संबोधिण्यात येईल.) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

५. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक, सचिन रामाजी मानकर यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनेच्या ठिकाणी जावुन फिर्यादी यांनी दाखविल्याप्रमाणे दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यांनी, दिनांक २५.०३.२०२१ रोजी, आरोपीला अटक फॉर्मनुसार अटक केली. त्यानंतर, त्यांनी साक्षीदारांची बयाने त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविली. तपासकाम पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा प्राप्त झाल्याने त्याच्याविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अन्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कारंजा (घा.) यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

६. संहितेचे कलम ३५३ अन्वये दंडनीय असणा–या खटल्याचे कामकाज चालविण्याचे अधिकार केवळ सत्र न्यायालयास असल्याने, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कारंजा (घा.) यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०७ ची

पूर्तता करून सदरचा खटला चालविण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०९ अन्वये सत्र न्यायालय, वर्धा यांच्याकडे दिनांक १०.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये वर्ग केला.

७. प्रस्तुत प्रकरणी आरोपी सत्र न्यायालयात हजर झाल्यानंतर दिनांक २१.११.२०२५ रोजी आरोपीविरुध्द संहितेचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अन्वये दोषारोप (नि.क्र.१०) ठेवून आरोप निश्चित करण्यात आले. सदर दोषारोप आरोपीला वाचून दाखवून, त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्याच्यावरील सर्व आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

८. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणी एकूण २ साक्षीदार तपासल्यानंतर, गुन्ह्यात गोवणा–या पुराव्याचे पुष्टीकरण घेण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये आरोपीचे जबाब (निशाणी क्रमांक २३) नुसार नोंदविण्यात आला. आरोपीने त्याला खोटया गुन्हयात गोवण्यात आल्याचा बचाव घेतला आहे.

९. निर्णयाकरीता उपस्थित झालेले मुद्दे, त्यावरील माझ्या निष्कर्षांसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने फिर्यादी लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारी बलप्रयोग केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय? | नकारार्थी. |
| **२.** | आरोपीने फिर्यादीचा शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशाचा वापर केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | नकारार्थी. |
| ४. | आरोपीने गुन्हा केला काय ? असल्यास कोणता? | नकारार्थी. |
| ५. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## –– <u>का र ण मि मां सा</u> ––

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत</u> :–**

१०. उपरोक्त मुद्यांवरचा पुरावा एकसारखा आणि परस्परांशी निगडीत असल्यामुळे, त्यांना एकत्रितपणे विचारात घेतले जात आहे.

११. आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने फिर्यादी आकाश नामदेवराव शेंडे (सा.क्र.१) (नि.क्र.१३) याची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या साक्षीत असे सांगितले की, वर्ष २०२१ मध्ये, ते महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, ठाणेगांव येथे तंत्रज्ञ या पदावर कार्यरत होते. ते आरोपीला ओळखतात. घटना दिनांक २५.०३.२०२१ रोजी, सकाळी ११.१५ वाजताच्या दरम्यान घडली. त्यादिवशी, थकबाकी असलेल्या वीज बिलांची यादी त्यांना देण्यात आली होती. त्यानंतर, ते जोगा या गावी गेले. थकित वीज बिलांची वसुली करतांना ते मनराज युवनाते याच्या घरी गेले. त्यावेळी तेथे एक महिला आणि काही मुले उपस्थित होते. त्यांनी त्यांना थकबाकीचे विद्युत बिल रक्कम रुपये २४००/– मागितले, त्यावेळी त्या महिलेने त्यांना सांगितले की, ती बिल भरु शकणार नाही. ते तिला म्हणाले की, वीज बिल भरले नाही, तर त्यांना विद्युत पुरवठा खंडित करणेबाबत आदेश आहेत. जेव्हा, ते मीटरमधील विद्युत पुरवठा कापण्यासाठी गेले, त्यावेळी त्या

मुलांनी ते का विद्युत पुरवठा खंडित करीत आहे असे म्हटले. त्यावेळी त्यांच्यापैकी एकाने लोखंडी सळाख किंवा फावडा त्यांच्या मागुन फेकला, परंतु तो त्यांना लागला नाही. जेव्हा ते मागे वळाले, त्याच्यापैकी एकाने त्यांच्या शर्टाची कॉलर पकडली. जेव्हा त्यांनी स्वतःला सोडवण्याचा प्रयत्न केला, त्या मुलाने त्यांच्या शर्टाचा खिसा फाडला.

१२. त्यांनी त्यांच्या साक्षीत पुढे सांगितले की, त्यांना गावातील लोकांकडुन कळाले की, त्यांच्या शर्टाचा खिसा फाडणारा आणि त्यांच्यावर लोखंडी सळाख किंवा फावडा फेकणारा मुलगा आरोपी होता. घटनेच्या वेळी, त्यांचे वरिष्ठ विशाल ढोले, सहायक अभियंता, त्र्यंबक चटारे, मुख्य तंत्रज्ञ, प्रशांत चारथड, तंत्रज्ञ आणि कंत्राटी (आऊटसोर्सींग) कर्मचारी तुषार हे देखील उपस्थित होते. आरोपीच्या कृत्यामुळे त्यांना त्यांचे अधिकृत कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यात आले. त्यानंतर, ते पोलीस स्टेशन, कारंजा (घा.) येथे गेले आणि त्याच दिवशी तक्रार (नि.क्र.पी.–१/सा.क्र.१) दाखल केली. त्यानुसार पोलीसांनी छापील प्रथम खबर अहवाल (नि.क्र.पी.–२/सा.क्र.१) तयार केला. दुस–या दिवशी, त्यांनी पोलीसांना घटनेचे ठिकाण दाखविले होते. त्यांनी मानराज युवनाते याच्या घराचे विद्युत बिल (नि.क्र.पी.–३/सा.क्र.१) पुरवले होते. सहायक अभियंता, विशाल ढोले यांनी दिनांक ०२.०३.२०२१ रोजी, पोलीसांना विद्युत बिल थकदाराची यादी देखील पत्रासह (नि.क्र.पी.–४ व ५/सा.क्र.१) दिली होती. सदर यादीत मानराज तुळशीराम युवनातेचे नाव देखील नमूद आहे.

१३. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये फिर्यादीने कथित घटनेच्या वेळी, त्याला आरोपीचे नाव माहिती नव्हते, गावक–यांकडुन त्याला आरोपीचे नाव कळाले. मात्र, कथित घटनेनंतर त्याने कधीही हल्लेखोराला पाहीले नसल्याची बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे. त्याचप्रमाणे फिर्यादीने त्याच्या

उलटतपासणीमध्ये मान्य केले आहे की, त्याचे जोगा हे मुळ गाव नाही, गावक–यांना त्यांच्या नावाने तो ओळखत नाही. घटनेनंतर तो जोगा या गावी दोन ते तीन महिन्यानंतर गेलेला होता, त्यावेळी आरोपी त्याला भेटला व आरोपीने त्याने काहीही केले नसल्याचे सांगितले, त्यावरुन त्याला आरोपीने सदरचे कृत्य न केल्याचे समजले व सदरची बाब त्याने पोलीस स्टेशनला जावुन पोलीसांना आरोपी हल्लेखोर नसल्याचे सांगितले, परंतु दोषारोपपत्र दाखल झाल्याचे पोलीसांनी त्याला म्हटले, हया बाबी त्याने उलटतपासणीमध्ये स्पष्टपणे मान्य केलेल्या आहेत.

१४. फिर्यादी यांच्या पुराव्याचे विवेचन केले असता, फिर्यादी यांनी कथित घटनेच्या वेळी, त्यांना आरोपीचे नाव माहिती नव्हते हे मान्य केले आहे. तसेच फिर्यादी यांनी गावक–यांकडुन आरोपीचे नाव कळाल्यानंतर, त्यांनी त्याचे नाव सांगितले आहे आणि कथित घटनेनंतर ते जोगा या गावी गेले होते हे मान्य केले आहे. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये दोन ते तीन महिन्यानंतर ते जोगा या गावी गेले होते आणि त्यावेळी त्यांना आरोपी भेटला होता. आरोपीने त्यांना सांगितले की, त्याने काहीही केले नाही. त्यावेळी त्यांना कळाले की, ज्याने हे कृत्य केले तो आरोपी नव्हता. फिर्यादी यांनी पुढे सांगितले की, ते पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि त्यांना सांगितले की, आरोपी हल्लेखोर नाही, परंतु पोलीसांनी त्यांना सांगितले की आता आरोपपत्र दाखल झाले आहे. फिर्यादी यांनी उपरोक्त मान्य केलेल्या बाबीवरुन स्पष्टपणे सिध्द होते की, आरोपीने फिर्यादीवर हल्ला केला नाही.

१५. फिर्यादीच्या एकंदरीत पुराव्यावरुन याप्रकरणी अभियोगपक्षाचे वतीने आरोपीची ओळखपरेड चाचणी झाल्याचे दिसुन येत नाही. याउलट, फिर्यादीच्या उलटतपासणीमध्ये तत्संबंधीची कोणतीही सूचना फिर्यादीस देण्यात आलेली नाही तथा फिर्यादी त्याच्या पुराव्यात ओळखपरेडविषयी काहीही सांगत नाही. उलटपक्षी, फिर्यादीच त्याच्या उलटतपासणीदरम्यान आरोपीने त्यास मारहाण केली नसल्याचे व

सदरची बाब पोलीसांना देखील सांगितल्याचे नमूद करतो. यावरुन प्रस्तुत मामल्यात आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यात अभियोगपक्ष सर्वस्वी अपयशी ठरल्याचे दिसुन येते. त्यामुळे, भारतीय पुरावा कायद्याचे कलम ९ अन्वयेची पुर्तता याप्रकरणी करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे फिर्यादीच अभियोगपक्षास आरोपीच्या ओळखीबाबत समर्थन करीत नाही.

१६. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने पंच साक्षीदार त्र्यंबक रामभाऊजी चटारे (सा.क्र.१) (नि.क्र.१६) याची साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, दिनांक २६.०३.२०२१ रोजी, ते महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, हेटी–कुंडी (कारंजा) ठाणेगांव येथे वायरमन या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी, ते कर्तव्यावर उपस्थित होते. त्यादिवशी, पोलीस स्टेशन, कारंजा (घा.) यांनी त्याला पंच म्हणुन काम करण्यासाठी बोलविले होते. त्यानुसार, पोलीसांनी त्याला नोटीस (नि.क्र.पी.–६/सा.क्र.२) जारी केली होती. त्याच्यासोबत प्रशांत चारकाय हे देखील अन्य पंच म्हणुन उपस्थित होते. ते युवनाते यांच्या घरी जोगा गावात गेले. घटनेचे ठिकाण फिर्यादीने दाखविले होते. पोलीसांनी त्याच्या उपस्थितीत घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.पी.–७/सा.क्र.२) तयार केला.

१७. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये पंच साक्षीदाराने ते घटनेच्या ठिकाणी गेले नाही आणि फिर्यादीने घटनेचे ठिकाण दाखविले नाही ही सुचना स्पष्ट शब्दात नाकारलेली आहे. तसेच घटनेच्या ठिकाणी त्याने पंचनाम्यावर सही केली नाही ही सुचना देखील स्पष्टपणे नाकारली आहे.

१८. फिर्यादी यांनी त्यांच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये कथित घटनेच्या वेळी, त्यांना आरोपीचे नाव माहिती नव्हते आणि गावक–यांकडुन आरोपीचे नाव कळाल्यावर त्यांनी आरोपीचे नाव सांगितले हे स्पष्ट शब्दात मान्य केलेले आहे. तसेच फिर्यादी यांनी आरोपीने त्यांना सांगितले की, त्याने

काहीही केले नाही, त्यावेळी त्यांना कळाले ज्याने कृत्य केले तो आरोपी नव्हता असे सांगितलेले आहे. फिर्यादी यांनी बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये ते पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि त्यांना सांगितले की, आरोपी हल्लेखोर नाही, परंतु पोलीसांनी त्यांना सांगितले की, आता आरोपपत्र दाखल झाले आहे. जेव्हा फिर्यादीनेच मान्य केले की, आरोपी हल्लेखोर नाही तेव्हा आरोपीविरूध्दचे आरोप सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरले आहे. फिर्यादी यांनी आरोपी हल्लेखोर नाही ही बाब मान्य केल्यामुळे, तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली असती तरी त्यामधून काहीही साध्य होणारे नव्हते. तपासी अधिकारी यांचा पुरावा हा केवळ परिपोषक पुराव्याचा भाग असतो आणि तो प्राथमिक/ठोस पुराव्याची जागा घेऊ शकत नाही.

१९. पंच साक्षीदार त्र्यंबक रामभाऊजी चटारे (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यात पोलीसांनी त्याच्या उपस्थितीत घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.पी.–७/सा.क्र.२) तयार केल्याचे सांगितले आहे. जेव्हा फिर्यादी या महत्वाच्या साक्षीदारानेच आरोपी हल्लेखोर नसल्याचे मान्य केले आहे तेव्हा घटनास्थळ पंचनामा सिध्द झाला तरी तो अभियोगपक्षाच्या कोणत्याही उपयुक्ततेचा नाही.

२०. भारतीय पुरावा कायदा कलम १०१ व १०३ नुसार गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी पूर्णपणे अभियोग पक्षावर असते. फिर्यादीनेच आरोपी हल्लेखोर नसल्याचे स्पष्ट शब्दात मान्य केल्यामुळे अभियोगपक्ष आपला भार सिद्ध करू शकले नाही. भारतीय पुरावा कायदा कलम १३४ नुसार साक्षीदारांची संख्या महत्त्वाची नसुन साक्षीदारांच्या साक्षीची गुणवत्ता महत्त्वाची असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी या महत्वाच्या साक्षीदारानेच आरोपीविरुद्ध साक्ष दिली नाही, त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषसिध्दी करु शकलेले नाही. तर बचाव पक्षाने पुराव्याच्या शृंखलेवर दाट संशय निर्माण केलेला असुन प्रस्तुत गुन्हयाशी आरोपीचा परस्परसंबंध दिसुन

येत नसल्याने अभियोगपक्षाचा पुरावा संशयास्पद ठरतो. सबब, संशयाचा फायदा हा निश्चीतच आरोपीस देणे संयुक्तिक ठरते.

२१. आरोपीने फिर्यादी लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारी बलप्रयोग केल्याचे, आरोपीने फिर्यादीचा शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान केल्याचे आणि जीवाने मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला या आरोपांसंदर्भात, फिर्यादीने स्वत:च आरोपी हल्लेखोर नसल्याचे मान्य केले आहे. अशा परिस्थितीत, गुन्हा घडला व त्यामध्ये आरोपीचा सहभाग होता, हे दाखवण्यासाठी कोणतीही पुष्टी देणारा पुराव्याचा अंश नाही. अशाप्रकारे, आरोपीचा तथाकथित घटनेशी संबंध प्रस्थापित करण्यास अभियोगपक्ष पूर्णपणे अयशस्वी ठरलेला आहे.

२२. अभियोगपक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन करता, फिर्यादी या महत्वाच्या साक्षीदारानेच आरोपी हल्लेखोर नाही हे मान्य केल्यामुळे, घटनेबाबत संशय निर्माण होतो. आरोपीविरूध्द त्याचा घटनेशी संबंध जोडण्याइतपत परिस्थितीजन्य पुरावा देखील न्यायालयापुढे उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपीविरूध्दचे दोषारोप सिध्द होत नाहीत. अभियोगपक्ष आरोपीविरूध्द संहितेचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ प्रमाणे दोषारोप सिध्द करण्यास अपयशी ठरलेले आहे. म्हणून मी मुद्दे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ बाबत</u> :–**

२३. मुद्दे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्षांनुसार आणि उपरोक्त चर्चेवरून अभियोगपक्ष आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अंतर्गत दोषारोप संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द करण्यास असफल ठरलेला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१) आरोपी आकाश धनराजजी युवनाते यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३५३, ५०४ आणि ५०६ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र आणि जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा याचिका दाखल झाल्यास हजर होण्याचा दृष्टीकोनातून रक्कम रुपये ५०,०००/– (पन्नास हजार) चे वैयक्तिक बंधपत्र आणि तेवढ्याच रकमेचा जातमुचलका दाखल करावा.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.05.05 16:26:58 +0530

वर्धा (हेमंत भ. गायकवाड)

दिनांक : ०५.०५.२०२६. सत्र न्यायाधीश, वर्धा

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त मुळ न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर शब्द–नि–शब्द एकसारखा व तंतोतंत जुळणारा आहे.

(प्रशांत ना. शेटे)

लघुलेखक ग्रेड–३